## यंत्राद्वारे भात लागवडीचे प्रात्यक्षिक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** कृषी विभाग आणि आत्माचे प्रकल्प संचालक यांच्या सहकार्याने इगतपुरी येथील विभागीय भात संशोधन केंद्रात यंत्राद्वारे भात लागवडीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

त्र्यंबकेश्वर तालुक्यातील तोरंगणचे शेतकरी शांताराम जाधव यांनी त्यांच्या भात लावणी यंत्राद्वारे उपस्थितांना भाताची आवणी करून दाखवली. जाधव यांनी शेतकऱ्यांच्या शंका आणि प्रश्नांना उत्तरे दिली. प्रात्याक्षिकानंतर विभागीय कृषी संशोधन केंद्रातील सभागृहात प्रकल्प संचालक अभिमन्यू काशीद यांनी शेतकऱ्यांना यंत्राद्वारे भात लागवडीचे फायदे सांगितले. या पध्दतीत पारंपरिक पद्धतीपेक्षा बियाणे कमी लागते. रोपांची मर कमी होते. लागवड खर्चात निम्मी बचत होते. भात उत्पादनात चांगली वाढ होते. मजुरांची संख्या कमी लागते. दिवसात तीन ते चार एकर भात लागवड होते. मजूर टंचाईवर हा पर्याय आहे. रवींद्र वाघ यांनी यंत्रासाठी नानाजी देशमुख प्रकल्पातून अनुदानाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

# व्यापार सहकार्यासह विकासावर लक्ष

## इंडो-जर्मन चेंबर आणि निमा पदाधिकारी बैठक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



### कौशल्य-आधारित प्रशिक्षण आणि उच्च शिक्षणाच्या संधी

इंडो-जर्मन चेंबर ऑफ कॉमर्स संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर निमा पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीमुळे नाशिकशी संबंधित औद्योगिक विकासाच्या विषयांसह कौशल्य-आधारित प्रशिक्षण आणि उच्च शिक्षणाच्या संधी यांनाही चालना मिळू शकेल. त्यामुळे ही बैठक औद्योगिक क्षेत्रासाठी महत्वपूर्ण ठरली.

**नाशिक :** भारत-जर्मनी व्यापार सहकार्यासह नाशिकमधील औद्योगिक विकास, कौशल्य-आधारित प्रशिक्षण आणि उच्च शिक्षणाच्या संधी हे विषय इंडो-जर्मन चेंबर ऑफ कॉमर्स संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या (निमा) पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत केंद्रस्थानी होते. निमा हाऊस येथे ही बैठक झाली.

यावेळी इंडो-जर्मन चेंबर ऑफ कॉमर्सकडून संचालक बीना नायर यांनी चेंबरचे कार्यक्षेत्र, भारत-जर्मनी भागीदारीतील संधी, तसेच नाशिकसारख्या औद्योगिक शहरांना जागतिक दर्जाच्या शिक्षण व प्रशिक्षण प्रणालीशी जोडण्याची भूमिका मांडली. त्यांनी स्थानिक उद्योगांशी सहकार्य वाढविण्याची आणि जागतिक पातळीवर प्रशिक्षणाच्या नव्या वाटा खुल्या करण्याची तयारी दर्शविली. निमाचे अध्यक्ष आशिष नहार यांनी चेंबरच्या पुढाकाराचे स्वागत करत नाशिकसारख्या प्रगत होत असलेल्या औद्योगिक शहरासाठी जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण व आंतरराष्ट्रीय नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध होणे ही मोठी गोष्ट असल्याचे सांगितले. नाशिकच्या उद्योजक, शिक्षण संस्था आणि विद्यार्थ्यांसाठी हे सहकार्य फायदेशीर ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भविष्यातील सहकार्याबाबत सकारात्मकता दर्शवली.

यावेळी परस्पर सहकार्य, कार्यक्रमांचे आयोजन, कौशल्याधारित रोजगार नियुक्ती (प्लेसमेंट्स) तसेच नाशिकसाठी विशेष प्रशिक्षण व प्रशिक्षण संधींची रूपरेषा मांडण्यात आली. चेंबरच्या कार्यक्रम अधिकारी शिल्पा हर्फ्ट यांनी अभ्यासक्रमांची माहिती दिली. या अभ्यासक्रमांचे उद्दिष्ट केवळ शैक्षणिक प्रमाणपत्र न देता, विद्यार्थ्यांना व्यावसायिक यशाच्या मार्गावर नेणे असल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीस आयमाचे अध्यक्ष ललित बुब, उपाध्यक्ष किशोर राठी, मनीष रावल, सचिव राजेंद्र आहिरे, कोषाध्यक्ष राजेंद्र वडनेरे, माजी अध्यक्ष निशिकांत आहिरे, कैलास पाटील, सी.एस. सिंग आदी उपस्थित होते.

## अकरावी प्रवेश प्रक्रियेवर शिक्षक नाराज

**नाशिक :** मे महिन्यात दहावीचा निकाल जाहीर होऊन दोन महिन्यांहून अधिक कालावधी लोटला असला तरी अद्यापही अकरावीचे वर्ग सुरू झालेले नाहीत. याबाबत महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघाने नाराजी व्यक्त केली आहे.

दहावीचा निकाल १३ मे रोजी जाहीर झाला. निकाल जाहीर झाल्यानंतर राज्य पातळीवर आभासी पध्दतीने एकाचवेळी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे सांगितले गेले. त्यानुसार प्रत्यक्ष ऑनलाईन प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले. परंतु, ते वेळापत्रक दोन ते तीन वेळा बदलण्याची नामुष्की शिक्षण मंडळावर आली. तांत्रिक कारणाने प्रवेश प्रक्रिया खोळंबली. आतापर्यंत अकरावी प्रवेशाच्या तीन फेऱ्या होऊनही अद्याप महाविद्यालयातील प्रवेश क्षमतेच्या ५० टक्केही विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले नाहीत. मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त आहेत. तिसऱ्या फेरीत बोटावर मोजण्याएवढ्या विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयांना देण्यात आली आहे. ऑनलाईन प्रक्रियेत महाविद्यालयाचा, पर्यायाने शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या वेळेचा अपव्यय केवळ प्रवेशासाठी होऊन प्रवेश संख्याही पाठविण्यात आलेली नाही. महाविद्यालय, पालक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये अस्वस्थेतेचे वातावरण असून ग्रामीण, शहरी आणि निमशहरी भागात अनुदानितच्या जागा मोठ्या प्रमाणावर रिक्त राहण्याची शक्यता आहे.

# प्रलंबित देयकांसह विविध प्रश्नांवर चर्चा

## जिल्हा मुख्याध्यापक संघ बैठक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित बैठकीत प्रलंबिध देयकांसह शालार्थ वेतन प्रणालीतील अडचणी आणि इतर समस्यांवर चर्चा करण्यात आली.

येवला तालुक्यातील एस. एन. डी. अभियांत्रिकी महाविद्यालयात ही बैठक झाली. प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय मुख्याध्यापक संघाचे सचिव एस. बी. देशमुख यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकात जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्था आणि मुख्याध्यापक यांना शालेय कामकाजातील अडचणींविषयी माहिती दिली. जिल्ह्यातील मुख्याध्यापकांच्या वतीने आमदार दराडे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पेसा भरती प्रक्रीया बंद करणे. प्रलंबित विविध देयके, वेतन व भविष्यनिधि कार्यालयात केली जाणारी अडवणूक, शालार्थ वेतन प्रणालीतील अडचणी, संस्थांतर्गत वाद, संच मान्यता, पदोन्नती मान्यता, रजाकालीन देयके आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रदिप सांगळे, कार्याध्यक्ष एस. के. सावंत, सचिव दीपक गायकवाड यांनी अडचणींचा पाढा वाचला. आमदार दराडे यांनी शिक्षक दरबाराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# प्रदीपसिंह पाटील यांना पर्यावरण गौरव पुरस्कार



**नाशिक :** पुणे येथील भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या फिरोदिया सभागृहात एन्व्हायरमेंटल क्लब ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या वतीने पर्यावरण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना पर्यावरण जीवनगौरव, पर्यावरण भूषण आणि पर्यावरण गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमात पंचवटीतील स्वामी विवेकानंद विद्यालयातील उपशिक्षक प्रदीपसिंग पाटील यांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरण क्षेत्रातील योगदानाबद्दल पर्यावरण गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. डी. यादव, शिरोळा तालुक्यातील १० हजार एकरपेक्षा जास्त क्षारपड जमीन सुपीक करून लागवडीखाली आणणारे गणपतराव पाटील तसेच एन्व्हायरमेंटल क्लब ऑफ इंडियाचे अध्यक्ष अमोल घमंडे, सचिव गणेश शिरोडे, खजिनदार सचिन पाटील यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्या हस्ते पाटील यांना सन्मानित करण्यात आले.

# वैनतेयतर्फे ब्रम्हगिरीच्या पोटातील श्रावणी प्रदक्षिणा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ही प्रदक्षिणा निवृत्तीरायांनी आपली भावंडे ज्ञानेश्वर महाराज, सोपान महाराज आणि मुक्ताबाई यांच्या समवेत केली होती.**



**एक पावसाळी भटकंती**

वैनतेय गिर्यारोहण गिरीभ्रमण संस्थेने आयोजित केलेली ब्रम्हगिरीच्या पोटातील श्रावणी प्रदक्षिणा म्हणजे एक पावसाळी भटकंतीही. ब्रम्हगिरीवर उगम होणाऱ्या पाच नद्या आणि अनेक झरे या प्रदक्षिणा मार्गावर लागतात. या प्रदक्षिणा वाटेत फारशी गर्दी नसते.

**नाशिक :** श्रावण सुरू होताच भाविकांना त्र्यंबकेश्वरजवळील ब्रम्हगिरी प्रदक्षिणेचे वेध लागतात. श्रावणातील चारही सोमवारी या प्रदक्षिणेला भाविकांची अलोट गर्दी असते. परंतु, याशिवाय ब्रम्हगिरीच्या पोटातून जाणाऱ्या मार्गानेही श्रावणी प्रदक्षिणा केली जाते. या मार्गाने जाणाऱ्यांची संख्या मात्र तुरळक असते. येथील वैनतेय गिर्यारोहण गिरीभ्रमण संस्थेने मंगळवारी ब्रम्हगिरी डोंगराच्या पोटातून जाणार्या मार्गाने श्रावणी प्रदक्षिणेचे आयोजन केले आहे.

ब्रम्हगिरीची श्रावणी प्रदक्षिणा फारच प्रसिद्ध आहे. ही प्रदक्षिणा दोन प्रकारची असते. एका प्रदक्षिणेत अंतर २० मैलांचे आणि दुसऱ्या प्रदक्षिणेत ४० मैलचे असते. स्थानिक अनेक जण ब्रम्हगिरी प्रदक्षिणेला फेरी म्हणतात. २० मैलांची लहान प्रदक्षिणा म्हणजे गाव प्रदक्षिणा. ही प्रदक्षिणा निवृत्तीरायांनी आपली भावंडे ज्ञानेश्वर महाराज, सोपान महाराज आणि मुक्ताबाई यांच्या समवेत केली होती. तिथेच मग त्यांना गहिनीनाथांनी नाथ सम्प्रदायाची दीक्षा दिल्याचे सांगितले जाते. तेव्हापासून निवृत्तीनाथ महाराजांच्या वारीला येणारे लाखो वारकरी ब्रम्हगिरीची गाव प्रदक्षिणा करतात. ही प्रचलित वाटेने केली जाणारी ब्रम्हगिरीची प्रदक्षिणा डोंगराच्या पायथ्याने केली जाते. यात कापड्या डोंगर आणि ब्रम्हगिरी यांच्या मध्ये असलेल्या गौतमाचा धस नावाने ओळखल्या जाणाऱ्या डोंगरमार्गे प्राचीन गौतम ऋषींच्या आश्रमावरून पुढे जाणारी लहान प्रदक्षिणा नमस्कार वाडीवरून जव्हार रस्त्याने जात पूर्ण होते. मोठी प्रदक्षिणा हरिहरचा किल्ला आणि त्याचा जोत्यांचा परिसर असलेल्या पुष्करणीवरुन जव्हार रस्त्याने जात त्र्यंबकेश्वरी पूर्ण होते.

वैनतेय गिर्यारोहण संस्थेचे संस्थापक जोशीकाका यांनी ब्रम्हगिरीच्या पोटातून केली जाणारी प्रदक्षिणा डोंगरभटक्यांमध्ये प्रसिद्ध केली. ब्रम्हगिरीवरच्या पाचही मेटांवरून (वाड्यांवरुन) या परिक्रमेचा मार्ग असणार आहे, जांबाच्या वाडीपासून सुरुवात होऊन इंडिखिंडीची मेट, विनायक खिंड, महादरवाजाची मेट, तिथल्या रेणूकेपासून हत्ती दरवाजाचे दर्शन घेत, गौतमाचा धस या डोंगरापासून गंगा मंदिराचे दर्शन घेत गंगेची मेटमार्गे दुर्ग भांडार डोंगराच्या पायथ्याला सुपल्याच्या मेटेवरून कडेलोटाच्या कातळावरच्या प्राचीन मूर्तीचे दर्शन घेण्यात येईल. त्यानंतर गहिनीनाथाची गुहा, अनुपान शिळा, गंगाद्वाराची मेट, भातखळे आणि तिथली बारव बघत कालिकेच्या वाटेने उतरून बडा उदासी आखाडा, असे १२.५ किमी अंतर असेल, अशी माहिती वैनतेयचे दुर्गप्रेमी प्रशांत परदेशी यांनी दिली.


**बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra** A GOVT. OF INDIA UNDERTAKING एक परिवार एक बैंक

**नवी मुंबई झोनल कार्यालय,**
सिडको जुनी प्रशासकीय इमारत, पी-१७ सेक्टर-१ वाशी, नवी मुंबई.
**ई-मेल:** bom2259@mahabank.co.in, legal_nvm@mahabank.co.in, **फोन:** ०२२-२०८७८७५१/५२

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना (जोडपत्र-IV-ए)**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ८(६) मधील तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की बँक ऑफ महाराष्ट्रकडे तारण/ भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून त्यांची कर्जदार व जामीनदार यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या उर्वरित थकबाकीच्या वसुलीसाठी खाली तक्त्यात नमूद केल्यानुसार दि. १३.०८.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे", आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर विक्री करण्यात येईल. कर्जदार व जामीनदार, थकबाकी रक्कम, अचल मालमत्तेचे थोडक्यात वर्णन आणि ज्ञात बोजे, ताब्याचा प्रकार, आरक्षित किंमत व बयाणा रक्कम इ. खाली नमूद करण्यात आलेले आहेत:

| अ. क्र. | कर्जदार | जामीनदार | ज्ञात बोज्यांसह अचल मालमत्तेचे थोडक्यात वर्णन | मागणी सूचनेनुसार थकबाकी रक्कम | आरक्षित किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. गोविंद तुकाराम शिरोडे** **श्रीमती राधिका गोविंद शिरोडे** पत्ता: रो हाऊस क्र. ४४७, गजानन मंदिर, सातपूर कॉलनी, सातपूर, नाशिक. | उपलब्ध नाही | सदनिका क्र. ३०२ व ३०३, हेरंब रेसिडेन्सी, प्लॉट क्र. १६, सर्व्हे क्र. ५९/१ए, मौजे गंगापूर, ध्रुवनगर, मोतीवाला कॉलेजजवळ, नाशिक, ता. व जि. नाशिक. **क्षेत्रफळ १२१.१९ चौ. मी. बिल्ट-अप.** **ताब्याचा प्रकार: प्रत्यक्ष** | ०१.०७.२०१७ रोजी रु.३०७९२५९/- अधिक दि. ०२.०७.२०१७ पासूनचे वार्षिक ९.३०% दराने न आकारलेले व्याज व मासिक हप्ते गृह कर्ज, अधिक सर्व खर्च, शुल्के व अधिभार किंवा झालेले इतर आनुषंगिक खर्च. | रु. २४,००,००० |
| २ | **श्री. सचिन शिरोडे** **श्रीमती वैशाली सचिन शिरोडे** पत्ता: रो हाऊस क्र. ०६, शुभम रो हाऊस, सावरकरनगर, सातपूर कॉलनी, सातपूर, नाशिक | **श्री. गोविंद शिरोडे** पत्ता: रो हाऊस क्र. ४४७, गजानन मंदिर, सातपूर कॉलनी, सातपूर, नाशिक. | सदनिका क्र. २०१ व २०२, श्री रेसिडेन्सी, प्लॉट क्र. ५८, सर्व्हे क्र. १९३/ए, मौजे सातपूर, नाशिक ४२२००७. क्षेत्रफळ १२३.०४ चौ.मी. बिल्ट-अप. **ताब्याचा प्रकार: प्रत्यक्ष** | ०८.१२.२०१७ रोजी रु.२९८१४७६/- अधिक दि. ०९.१२.२०१७ पासूनचे वार्षिक ९.३०% दराने न आकारलेले व्याज व मासिक हप्ते गृह कर्ज, अधिक सर्व खर्च, शुल्के व अधिभार किंवा झालेले इतर आनुषंगिक खर्च. | रु. २१,००,००० |
| ३ | **श्री. अरुण किसन शेळके** पत्ता: सदनिका क्र. १३, विंध्याचल सोसायटी, बोधलेनगर, नाशिक- ४२२००६ | **जितेंद्र सोमनाथ निमगुलकर** **पत्ता:** ०२, मोरेश्वर अपार्टमेंट, मलंग सोसायटीजवळ, नाशिक रोड, नाशिक- ४२२००६. **श्री.अरुण कृष्णराव चव्हाण** | सदनिका क्र. १६, तिसरा मजला, ईश्वरी हाइट्स सीएचएस लि., प्लॉट क्र. १३, पाथर्डी गाव, नाशिक ४२२०१०. क्षेत्रफळ ५५.७६ चौ.मी. चटई **ताब्याचा प्रकार: प्रत्यक्ष** | १५.०७.२०१७ रोजी रु.३३०७१५३/- अधिक दि. १६.०७.२०१७ पासूनचे वार्षिक ९.३०% दराने न आकारलेले व्याज व मासिक हप्ते गृह कर्ज, अधिक सर्व खर्च, शुल्के व अधिभार किंवा झालेले इतर आनुषंगिक खर्च. | रु. १६,७०,००० |
| ४ | | अंजुमन सेलजवळ, गोसावीवाडी, नाशिक रोड, नाशिक - ४२२००६. | सदनिका क्र. २२, चौथा मजला, ईश्वरी हाइट्स सीएचएस लि., प्लॉट क्र. १३, पाथर्डी गाव, नाशिक ४२२०१०. क्षेत्रफळ ५५.७६ चौ.मी. चटई **ताब्याचा प्रकार: प्रत्यक्ष** | | रु. १६,०६,००० |
| ५ | **मे. भाऊट्रेडिंग कंपनी (प्रोप्रा. श्री. राजेश जिभाऊ बोरसे)** मु. देवळा, एपीएमसी समोर, देवला, तालुका देवला, जि. नाशिक- ४२३१०२. | **श्री. ज्ञानेश्वर नानाजी पवार** मु. पोस्ट भौर, ता. देवळा, जि. नाशिक- ४२३५०२ **श्री. दिनकर कारभारी सूर्यवंशी** कळवण रोड, मार्केट गेटसमोर, ता. देवळा, जि. नाशिक - ४२३५०२ | प्लॉट क्र. ४, स. क्र. १८४/७, एमएसईबी उप-केंद्रासमोर, देवळा-मालेगाव रोड, ता. देवळा, जि. नाशिक. क्षेत्रफळ ३०० चौ.मी. **ताब्याचा प्रकार: प्रत्यक्ष** | १९.११.२०१८ रोजी रु.१३९००८१०.०० अधिक दि. १९.११.२०१८ पासूनचे न आकारलेले व्याज व सर्व खर्च, शुल्के व अधिभार किंवा झालेले इतर आनुषंगिक खर्च. | रु. २२,६८,००० |
| ६ | | | प्लॉट क्र. ५, स. क्र. १८४/७, एमएसईबी उप-केंद्रासमोर, देवळा-मालेगाव रोड, ता. देवळा, जि. नाशिक. क्षेत्रफळ ३०० चौ.मी. **ताब्याचा प्रकार: प्रत्यक्ष** | | रु. २५,९२,००० |
| ७ | **श्री. रवींद्र सखाराम दोंदे** घर क्र. ९२, गल्ली क्र. ५, राहुलवाडी, पेठ रोड, पंचवटी, नाशिक- ४२२००३. | श्रीमती शैला सखाराम दोंदे, श्री. किरण मनोहर दोंदे | बंगला क्र. १५, शांती निकेतन सीएचएस, हॉटेल कुणालच्या मागे, अमृत धामजवळ, मुंबई आग्रा रोड, नाशिक, महाराष्ट्र. क्षेत्रफळ सुमारे ३५४.२८ चौ.मी. **ताब्याचा प्रकार: प्रत्यक्ष** | २६.०९.२०१८ रोजी रु.४०,०६,४९४/- अधिक दि. २६.०९.२०१८ पासूनचे वार्षिक ९.१५% दराने न आकारलेले व्याज व मासिक हप्ते अधिक सर्व खर्च, शुल्के व अधिभार किंवा झालेले इतर आनुषंगिक खर्च. | रु. २५,१०,००० |
| ८ | **कमल कंस्ट्रक्शन कंपनी** प्रोप्रा. श्री. राधाकिशन डी धनजल बंगला क्र. १५, न्यू शांतीनिकेतन सीएचएस, हॉटेल कुणालच्या मागे, रासबिहारी स्कूलजवळ, पंचवटी, नाशिक - ४२२००३. | **श्री. नरेश राधाकृष्ण धनजल** बंगला क्र. १५, न्यू शांतीनिकेतन सीएचएस, हॉटेल कुणालच्या मागे, अमृत धामजवळ, मुंबई आग्रा रोड, नाशिक, महाराष्ट्र. **श्री. संजय रामराव मगर** रूम क्र. २४१, प्लॉट क्र. ८, यमुनानगर, शाहूनगरजवळ, आयटीआयच्या मागे, सिडको, नाशिक. | बंगला क्र. १५, शांती निकेतन सीएचएस, हॉटेल कुणालच्या मागे, अमृत धामजवळ, मुंबई आग्रा रोड, नाशिक, महाराष्ट्र. क्षेत्रफळ सुमारे ३५४.२८ चौ.मी. **ताब्याचा प्रकार: प्रत्यक्ष** | कॅश क्रेडीट सुविधेसाठी रु.११४८९२४१/- अधिक दि. २६.१०.२०१५ पासूनचे १२.९५% दराने व्याज आणि मुदत कर्ज सुविधेसाठी रु.१०८९१३३ अधिक दि. २६.१०.२०१५ पासूनचे १४.९५% दराने व्याज. | रु. १६,००,००० |
| ९ | **श्री. बाळासाहेब रावबा शिरोळे** सदनिका क्र. १०१, आशियाना सोसायटी, टागोरनगर, औरंगाबादकर सोसायटीच्या मागे, नाशिक-पुणे रोड, नाशिक - ४२२००६ | श्री. निवृत्ती वामनराव भदाणे श्री. निवृत्ती डब्ल्यू भदाणे श्री. गिरीश जिभाऊ जाधव | रो हाऊस क्र. ७, तळ व पहिला मजला, सोनू रो हाऊसेस अपार्टमेंट, प्लॉट क्र. ३३, वडाळा गाव, नाशिक. क्षेत्रफळ सुमारे ९५.२६ चौ.मी. **ताब्याचा प्रकार: सांकेतिक** | ३१.१२.२०१६ रोजी रु.३९,६३,८८३/- अधिक दि. ०१.०१.२०१७ पासूनचे न आकारलेले व्याज व मासिक हप्ते कर्ज, अधिक सर्व खर्च, शुल्के व अधिभार किंवा झालेले इतर आनुषंगिक खर्च. | रु. २३,९३,००० |

**बयाणा रक्कम:** आरक्षित किमतीच्या १०%
**पाहणी दिनांक:** ०२.०८.२०२५
**संपर्क तपशील:** श्री. मनमोहन मुरमू, शाखा व्यवस्थापक, एआरबी शाखा - ९५५२८०८१८५.
विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया बँकेच्या वेबसाइटवर दिलेली "https://www.bankof\maharashtra.in/propsale.aspl तसेच E-bkray पोर्टलवरील (www.baanknet.com) लिंक पाहावी.

**दिनांक:** २८.०७.२०२५ — प्राधिकृत अधिकारी व बँक ऑफ महाराष्ट्र
**स्थान:** नवी मुंबई — नवी मुंबई झोन



**FEDBANK FINANCIAL SERVICES LIMITED**

**फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि.**
**युनिट क्र.: ११०१, ११ वा मजला, सिग्नस, प्लॉट क्र. ७१अ, पवई, पासपोली, मुंबई - ४०० ०८७**

**ताबा सूचना**

ज्याअर्थी

फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि. यांचे अधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४, २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सहवाचता कलम १३ (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदार, गहाण ठेवणारे, सह-कर्जदार आणि जामीनदार:- **(१) अनिल ज्ञानदेव विरळ (सह-कर्जदार) (२) सखुबाई ज्ञानदेव विरळ (सह-कर्जदार) यांना कर्ज खाते क्र. एफईडीएनएसएस०एचएल०५०९०५९ यात दि. २१.०४.२०२५ रोजीनुसार रु. २०,२४,३१९/- (रुपये वीस लाख चोवीस हजार तीनशे एकोणीस फक्त)** मागणी सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत, करारानुसार दराने त्यावरील पुढील व्याजासह सर्व खर्च, शुल्क आणि आनुषंगिक खर्च इत्यादीसह परतफेड करण्यासाठी मागणी करणारी मागणी सूचना दिनांकित **२ मे २०२५** जारी केली.

वर उल्लेख केलेल्या कर्जदार, गहाण ठेवणारे, सह-कर्जदार आणि जामीनदाराने वरील रक्कम विशिष्ट कालावधीत परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार, गहाण ठेवणारे, सह-कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकार अधिकृत अधिकाऱ्याने दि. **२६ जुलै २०२५** रोजी सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सहवाचता सरफेसी कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा **ताबा** घेतला आहे.

विशेषतः वर उल्लेख केलेले कर्जदार, गहाण ठेवणारे, सह-कर्जदार आणि जामीनदार आणि सर्वसाधारणपणे जनतेला येथे इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी खालील मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि खालील मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार हा **खाते क्र. एफईडीएनएसएस०एचएल०५०९०५९ यात दि. २१.०४.२०२५ रोजीनुसार रु. २०,२४,३१९/- (रुपये वीस लाख चोवीस हजार तीनशे एकोणीस फक्त)** या रकमेसाठी फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) याकडे आमंत्रित केले आहे.

**अनुसूची १**
**गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**

**फ्लॅट क्र. ५, क्षेत्रफळ मोजमापे ३७.१३ चौरस मीटर + बालोद्यान एकूण ३८.८२ चौरस मीटर कार्पेट. दुसऱ्या मजल्यावर, 'रुद्र प्रेम अपार्टमेंट' नावाच्या इमारतीत जी प्लॉट क्र. ३ वर बांधली गेली आहे, सर्वेक्षण/गट क्रमांक ८५/१८ मधून, मौजे दसक, ता. आणि जिल्हा नाशिक येथे स्थितचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.**

चतु:सीमा खालीलप्रमाणे:
पूर्व: फ्लॅट क्रमांक ६+ जिना
पश्चिम: सीमांत जागा
उत्तर: सीमांत जागा
दक्षिण: फ्लॅट क्रमांक ४

**ठिकाण: - नाशिक** — **(अधिकृत अधिकारी)**
**दिनांक: - २६.०७.२०२४** — **फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि.**



**निडो होम फायनान्स लिमिटेड** nido HOME FINANCE

**(पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली) नोंदणीकृत कार्यालय : ५वा मजला, टॉवर ३, विंग "बी", कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०००७०. प्रादेशिक कार्यालय : : ऑफिस नं. ४०७-४१०, चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, सीटीएस नं. २६८७बी, गणेशखिंड रोड, भाम्बुर्डे, शिवाजीनगर, पुणे-४११०१६, महाराष्ट्र.**

**ई-लिलाव - 30 दिवसीय सांविधिक विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.

आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, याखाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री कर्ज देणींच्या वसुलीपर्यंत जोडलेल्या तालिकेत नमूद केल्यानुसार रकमेच्या वसुलीकरिता **"जसे आहे जेथे आहे", जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. उक्त मालमत्ता **"मेसर्स निडो होम फायनान्स लिमिटेड"**कडे (**पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली**) ऋणको, सह-ऋणको व हमीदाराद्वारा लाभ घेतलेल्या कर्जाकरिता गहाण ठेवण्यात आली आहे. सुरक्षित धनकोंनी याखाली नमूद केलेल्या सुरक्षित मत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

| अनु क्र. | ऋणको / सह-ऋणको / हमीदाराचे नाव | वसुलीची रक्कम | राखीव किंमत व इरठे | लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | **दत्तात्रय भुजंगराव अनवाडे (ऋणको), गोरख भुजंगराव अनवाडे (सह-ऋणको) व कुणाल दत्तात्रय अनवाडे (सह-ऋणको)** | रु. ११,८६,१८२/- (रुपये अकरा लाख शहाऐंशी हजार एकशे ब्याऐंशी फक्त) **२६.०७.२०२५ रोजीप्रमाणे** + त्यावरील पुढील व्याज + विधि खर्च - **एलएएन नं. : L0870STHL000005332883** करिता आणि रु. १,२०,१९८/- (रुपये एक लाख वीस हजार एकशे अठ्याण्णव फक्त) **२६.०७.२०२५ रोजीप्रमाणे** + त्यावरील पुढील व्याज + विधि खर्च - **एलएएन नं. : L087STHLP00000333076** करिता | **रु. १२,१८,७६६/-** (रुपये बारा लाख अठरा हजार सातशे सहासष्ट फक्त) **इसारा रक्कम ठेव :- रु. १,२१,८७६/-** (रुपये एक लाख एकवीस हजार आठशे शहात्तर फक्त) | **११.०९.२०२५ - स. ११.०० व दु. १२.०० दरम्यान (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं-विस्तारासह)** |
| **पाहाणीची तारीख व वेळ : ०५.०८.२०२५ - स. ११.०० व दु. ०३.०० दरम्यान** | | | **प्रत्यक्ष ताबा तारीख : १७.०६.२०२५** | |
| **सुरक्षित मत्तेचे वर्णन** : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - फ्लॅट नं. ०४, एकूण एरिआ मोजमापाचा ३६०.०० चौ.फू. म्हणजेच ३३.४५ चौ.मी., तळमजल्यावरील, "निर्मल घरकूल" प्रोजेक्ट ए म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील, सेक्शन ए-४, प्लॉट नं. २ यावर बांधकाम केलेला, असलेला मान्यताप्राप्त लेआउट प्लान एरिआ मोजमापाचा ६८५८ चौ.मी., गॅट नं. ५१२/१ व येथे स्थित - भंडारदारा नावाचे स्थानिक व्हिलेज, व्हिलेज समणगाव, ता. व जि. नाशिक, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या स्थानिक मर्यादेत व नोंदणी व मुद्रांक उप-निबंधक नाशिकच्या मर्यादेत. | | | | |
| २. | **अरुण रामजी केदार (ऋणको), पुनम अरुण केदार (सह-ऋणको) व संतोष मधुकर काकड (हमीदार)** | **रु. २०,४९,९५७/-** (रुपये वीस लाख एकोणपन्नास हजार नऊशे सत्तावन्न फक्त) **२६.०७.२०२५ रोजीप्रमाणे** + त्यावरील पुढील व्याज + विधि खर्च - **एलएएन नं. : LNSKSTH0000094132** करिता | **रु. २०,४८,५२९/-** (रुपये वीस लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे एकोणतीस फक्त) **इसारा रक्कम ठेव :- रु. २,०४,८५२/-** (रुपये दोन लाख चार हजार आठशे बावन्न फक्त) | **११.०९.२०२५ - स. ११.०० व दु. १२.०० दरम्यान (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं-विस्तारासह)** |
| **पाहाणीची तारीख व वेळ : ०५.०८.२०२५ - स. ११.०० व दु. ०३.०० दरम्यान** | | | **प्रत्यक्ष ताबा तारीख : १८.०३.२०२५** | |
| **सुरक्षित मत्तेचे वर्णन** : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - फ्लॅट नं. २०, एरिआ मोजमापाचा ५६.६९ चौ.मी. बिल्ट-अप म्हणजेच ६१२ चौ.फू. "नानाश्री अपार्टमेंट-३", प्लॉट नं. ४५/४६ वरील, सर्व्हे नं. ३१/बी/१, पिंपळगाव बहुला, ता. व जि. नाशिक, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत. **उक्त फ्लॅट पुढीलप्रमाणे सीमित : पूर्व** : फ्लॅट नं. १९, **पश्चिम** : फ्लॅट नं. २१, **दक्षिण** : मार्जिनल स्पेस, **उत्तर** : स्टेअरकेस. | | | | |
| ३. | **अमोल जगदिश साबळे (ऋणको), अश्विनी अमोल साबळे (सह-ऋणको)** | **रु. १७,५६,४५५/-** (रुपये सतरा लाख छप्पन्न हजार चारशे पंच्चावन्न फक्त) **२६.०७.२०२५ रोजीप्रमाणे** + त्यावरील पुढील व्याज + विधि खर्च - **एलएएन नं. : LNSKSTH0000045691** करिता | **रु. २२,००,०००/-** (रुपये बावीस लाख फक्त) **इसारा रक्कम ठेव :- रु. २,००,०००/-** (रुपये दोन लाख फक्त) | **११.०९.२०२५ - स. ११.०० व दु. १२.०० दरम्यान (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं-विस्तारासह)** |
| **पाहाणीची तारीख व वेळ : ०५.०८.२०२५ - स. ११.०० व दु. ०३.०० दरम्यान** | | | **प्रत्यक्ष ताबा तारीख : ०३.०४.२०२५** | |
| **सुरक्षित मत्तेचे वर्णन** : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - फ्लॅट नं. ६०१, "ए" विंग, सहाव्या मजल्यावरील, असलेला एकूण एरिआ मोजमापाचा ४०.८९ चौ.मी. म्हणजेच ४४०.०० चौ.फू. कार्पेट, "रिव्हेरिने नेस्ट" म्हणून ज्ञात असलेली बिल्डिंग (पूर्वीची "भावी होम्स अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेली) व येथे स्थित - धारण केलेला सर्व्हे नं. ८५/१६, जमीन एरिआ मोजमापाचा ५५आर म्हणजेच ५५०० चौ.मी., २३.९२ चौ.मी. रुंद रोडसह (त्यापैकी विकासासाठी दिलेला एरिआ ४४२०.०० चौ.मी. वगळता) "ए" विंगचा उर्वरित भाग १०८०.०० चौ.मी. आहे व येथे स्थित - व्हिलेज दसक, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत. **उक्त मालमत्ता पुढीलप्रमाणे सीमित : पूर्व** : मार्जिनल स्पेस, **पश्चिम** : फ्लॅट नं. ६०२, **दक्षिण** : कॉमन डक्ट व बी विंग, **उत्तर** : स्टेअरकेस. | | | | |

**नोंदी :** १) लिलाव विक्रीचे आयोजन https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाइटद्वारा ऑनलाइन करण्यात येणार आहे आणि ज्या बोलीदारांकडे वैध ईमेल, आयडी पुरावा व फोटो पुरावा, पॅन कार्ड आहे आणि ज्यांनी डिमांड ड्राफ्ट / एनईएफटी / आरटीजीएसद्वारा इरठेचे यथोचितरीत्या प्रदान केलेले आहे तेच केवळ या **"ऑनलाइन ई-लिलावा"**त सहभागी होण्यास पात्र असणार आहेत.
२) स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांची इरठे डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटीद्वारा सादर करण्याचा मार्ग : **लाभाधिकारीचा नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड, बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, अकाउंट नं. : ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : SBIN0001593.**
**३) इरठेसमवेत बोली प्रपत्रे ऑनलाइन सादरीकरणाकरिता शेवटची तारीख १०.०९.२०२५ आहे.**
४) विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाइटला भेट द्यावी किंवा **कृपया संपर्क साधावा : श्री. मौलिक श्रीमाली, फोन : +९१-६३५१८९६६४३/९१७३५२८७२७, हेल्प लाईन ईमेल आयडी : Support@auctiontiger.net**

**मोबाईल नं. : ७४००११०३३९ / ७४००११३२८७ / ८९५६५५४४७७** — **स्वाक्षरी/-प्राधिकृत अधिकारी**
**दिनांक : २९.०७.२०२५** — **निडो होम फायनान्स लिमिटेड, (पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)**